नियमीत दि. मु. क्र. ५७/२०१५
प्रकाश जाधव
विरु
कृष्णा जाधव व इतर.

## निशाणी ५ खालील आदेश

वाटप, हक्कप्रस्थापन, निरंतर मनाई या मूळ मागणीच्या असलेल्या दाव्यामध्ये वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १,२ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला. प्रतिवादी क्र.२ यांनी दावामिळकतीत ढवळाढवळ करू नये, अशी अंतरीम मनाई मागितली.

२. अर्ज, थोडक्यात खालीलप्रमाणे:-

मौजे दाभेदाभेकर ता. महाबळेश्वर येथील वादपत्र कलम १(अ),(ब),(क) मध्ये नमूद असलेल्या शेतजमीनी, दोन घर मिळकती वादविषय होय. त्यापैकी गट नं. ५२ हि मिळकत सदर अर्जाचा विषय आहे. (इतःपर 'दावामिळकत' असे संबोधिले आहे. दावा मिळकती त्या मूळ गोविंद यांच्या मालकीच्या होत. तदनंतर बापू, शांताबाई, बाबु, रघुनाथ यांचेकडून तडजोडप्रमाणे त्या प्रवादी-१ कृष्णा यांना प्राप्त झाल्या. प्रवादी-१ हे वादीचे वडील. प्रवादी-१ ने कोणत्याही कायदेशीर गरजेशिवाय गट नं. ५२ ही प्र.वादी क्र.2 यास विकली. दावा मिळकतीचे अद्याप वाटप नाही. वडीलोपार्जित असल्याने वादीचा त्यामध्ये हिस्सा आहे. दि. ७/२/२०११ या दिवशी प्रत्यक्ष वाटप मागणी केली. हिश्श्यावर बोजा/अधिकार नाही असे ज्ञापन मागितले. सबब प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी क्र. 2 यांनी नि. २१ लगत म्हणणे दाखल केले. स.नं. ५२ हि मिळकत वादीचे एकत्र कुटुंबाची मिळकत नाही. वंशावळ चुकीची आहे. स.नं. ५२ मुळत: धनाजी धोंडु जाधव यांची होत. त्यांनी धोंडु रामा पोंगे यास विकली. धोंडुनी सदर जमीन रमेश आनंदा जाधव (प्र.वा.2) यास तोंडी खरेदी दिली. परंतु कृष्णा ने धनाधिकाराने त्याचे नाव लावून घेतले. म्हणून त्याचे नावाने रेकॉर्डवर नाव लावून घेतले. कृष्णाचा सदर जमीनीशी काही संबंध नाही, त्याची वहीवाट देखील नव्हती. त्याच्या नावाच्या फेरफार याची "..." याची माहिती नाही. नोंद बेकायदेशीर/बेगल होती. अशी कथने करीत वादी आणि इतर वारसांना आहे. अशी कथने करीत अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

18.1.

..२/-

४. प्रतिवादीनी शपथपत्रासह ७/१२ उतारे, फेरफार उतारे खरेदीपत्राची प्रत इ. कागद हजर केले.

५. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. जी. सी. नाटकर आणि प्रतिवादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. मं. गा. मोहिरे यांचे युक्तीवाद ऐकले.

६. अर्जाच्या निर्णयाच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्याचे सकारण निष्कर्ष मी खाली नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीस सकृतदर्शनी प्राबल्य आहे का? | होय. |
| २. न्यायाचा तराजु वादींचे पक्षात आहे का? | होय. |
| ३. तामीद नाकारल्यास वादींचे अपरीमीत नुकसान होईल का? | होय. |
| ४. आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

: कारणमिमांसा :

मुद्दा क्र.१:

७. प्रतिवादी क्र.१ हे प्रतिवादी क्र.२ नी घेतलेल्या मिळकतीचे विक्रेते आहेत. सदर खरेदीखत नोंदणीकृत आहे. त्यामधील कथनानुसार स.नं. ५२ हि मिळकत प्रवादी क्र.१ ची वडीलार्जीत मिळकत असून वारसाने मिळाली आहे. त्यांचे कब्जेवहीवाटीची आहे असेही नमूद आहे. (खरेदीखत प्रत नि. ३/१४ मधील कलम ३ पहा.) यावरुन सकृतदर्शनी प्रवादी-२ यांनी प्रवादी-१ ची वारस मालकी कबुल केल्याचे दिसते. म्हणून याबाबी पुन्हा त्यांच्या मालकीवर आक्षेप घेण्यासाठी भारतीय पुरावा कायदा कलम ११५ अन्वये प्रतिबंध (estoppel) निर्माण होईल. सदर खरेदीपत्रातील बाबी याबाबी बरोबर आहेत असे गृहीतक पुरावा कायदा कलम ११४ नुसार मानावे लागेल. तथापि सदर गृहीतक खोडून काढण्याजोगे आहे, पण त्या ताकदीचा पुरावा तूर्त तरी नाही. त्याकरीता दाव्याची चौकशी होणे आवश्यक आहे.

18.1.



Scanned by CamScanner

८. प्रतीवादी क्र. २ तर्फे नि. ३५ ते ४४ हे कागद दाखल करून उपरोक्त मुद्दीतम खोडून काढण्याचा प्रयत्न केला. सदर कागद म्हणजे जुने फेरफार उतारे आहेत. फे. क्र. ७७ (नि. ३८) नुसार धोंडु रामा रींगे याने गोंडी खरेदी केल्याची नोंद आहे. पण सन १९८३/८४ पासून प्रवादी क्र. १ ची नोंद आहे. (नि. ४१). सदर नोंद वादातील खरेदीपत्रापर्यंत ७/१२ पत्रकी आहे. ती नोंद असल्याचे कारण शोधणे आवश्यक आहे. प्रतीवादी क्र. २ म्हणतात की ती बोगस नोंद आहे. सदर कथन एक क्षणभर मुद्दीत धरले तर मग त्यांनी खरेदीपत्र करून घेण्याचे कारण काय? ती नोंद बोगस आहे म्हणून रीतसर कायदेशीर प्रक्रीया करून घेण्यास काहीच हरकत नव्हती. त्यामुळेही सदर खरेदीपत्रात श्री ... कुळाची वडीलोपार्जीत असे खरेदीपत्रात फे. नं. ११९ (नि. ३९) हा स. नं. ४५ नमुद आहे. त्यानुसार कुळाचे गाव स. नं. शी निगडीत आहे. त्यानुसार कुळाचे पत्ते लागेल. पण ५२ ला पत्ते लागले हे पत्ते लागेल. पण प्रदीर्घ कालावधीपासुन असलेली त्याची नोंद करून दर्शनी वादींना आणि खरेदीपत्र याबाबत करून दर्शनी प्राबल्य दिसते. (prima facie case).

९. प्रवादी क्र. १ यास कायदेशीर गरज होती ही प्रतीवादी क्र. २ नी कथन केलेली नाही. क्रमशः वादींनी मागणी केलेल्या वाद्या आणि ताबनाच्या करून दर्शनी केस आहे. सबब पार्श्वभूमीवर वादीला मुद्दा क्र. १ ही होकारार्थी ठरविले.

<u>मुद्दा क्र. २, ३ :</u>

१०. वादअर्जातील अंतीम मागणी आणि उपरोक्त सकृतदर्शनी बाबींच्या पार्श्वभूमीवर न्यायाची तौलानिक बाजु वादींच्या पक्षात दिसते. प्रतिवादी क्र. २ नी सदर मिळकत तबदील केल्यास दाव्याची गुंतागुंत वाढेल. तसेच वादींच्या दाव्यावर गदा येईल. सबब वादीर नाकारल्यास वादींचे अपरीमीत नुकसान होईल. म्हणून मुद्दा क्र. २, ३ ही होकारार्थी ठरविले.

--- ४/-

११. त्यामुळे अर्ज मंजूर होणे क्रमप्राप्त आहे. सबब मी खालील आदेश पारीत करतो:

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत आला.

२. प्रतिवादी क्र. 2 यांनी दावा मिळकत सर्वे नं. 52 बाबत कोणत्याही प्रकारचे तबदीलीचे व्यवहार करू नयेत अशी त्यांना दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो अंतरीम ताकीद देण्यात येत आहे.

३. अंतीम निकालावेळी खर्चाबाबत आदेश होईल.

स्थळ: महाबळेश्वर
दिनांक: १८ जानेवारी २०१६

(प्र. अ. कुंभोजकर)
दिवाणी न्यायाधीश
(कनिष्ठ स्तर)
महाबळेश्वर.

Scanned by CamScanner